निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य/थेट सरपंचाच्या रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेलद्वारे**

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०६/०४/२०२३

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

**विषय :- निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य/थेट सरपंचाच्या रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम**

संदर्भ :- १. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २०/०२/२०२३ चे मतदार यादी कार्यक्रम आदेश.
२.आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०६/०४/२०२३ चे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आदेश.

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण ,संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ii ) आयोगाच्या समक्रमांकाच्या संदर्भाधीन दिनांक २०/०२/२०२३ च्या आदेशान्वये राज्यातील २६२० ग्रामपंचायतीतील निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या सदस्यांच्या ३६६६ जागा तसेच सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४२, दिनांक २६ ऑगस्ट २०२२ च्या कलम ७ नुसार थेट सरपंचाच्या १२६ रिक्त जागांच्या पोटनिवडणूकांसाठी दिनांक ०९/०३/२०२३ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

iii) मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दिनांक १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

iv) समर्पित आयोगाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा निश्चित करण्यासाठी अहवालामध्ये टक्केवारीची शिफारस केलेली आहे. समर्पित आयोगाच्या अहवालानुसार सदस्यांच्या जागा रिक्त असलेल्या ग्रामपंचायतीला नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या टक्केवारीची शिफारस करण्यात आली आहे किंवा कसे याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर करण्याबाबत आयोगाच्या दिनांक २०/०२/२०२३ च्या पत्रान्वये कळविले होते. राज्यातील २६२० ग्रामपंचायतीमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या ६१५ जागा रिक्त असल्याचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाला आहे.

समर्पित आयोगाच्या शिफारसी विचारात घेता, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागा अतिरिक्त ठरत असल्यास त्या अनारक्षित करुन सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित ठेवून सोडत काढण्यासाठी आयोगाच्या संदर्भ क्र. २ येथील दिनांक ०६/०४/२०२३ च्या आदेशानुसार आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दिलेला आहे.

v) **सबब, दिनांक ०९/०३/२०२३ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द झालेल्या सुमारे २६२० ग्रामपंचायतींमधील सदस्यांच्या ३६६६ रिक्त जागांसाठी तसेच १२६ थेट सरपंचाच्या रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.**

vi) **वरील सर्व बाबी विचारात घेऊन मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून,** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, **दिनांक ०९/०३/२०२३ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द झालेल्या ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांचा (सदस्य/थेट सरपंच) पोटनिवडणुक कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.**

## आदेश

१) **परिशिष्ट १** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट २** मध्ये दर्शविलेल्या ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणुका घेण्यात याव्यात.

२) **महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ११ (३) मधील तरतुदीनुसार ज्या ग्रामपंचायतीची मुदत समाप्त होण्यास ६ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे व या कालावधीत पद रिक्त झाले आहे, अशा रिक्त पदांचा समावेश करण्यात येऊ नये.**

३) निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये, निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

(आयोगाचे आचारसंहितेबाबतचे दि. १४/१०/२०१६ चे एकत्रित आदेश, दि.०६/०९/२०१७ चे अतिरिक्त आदेश व दिनांक १७/१२/२०२० चे पत्र)

४) **या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावी.**

५) सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ , दिनांक २० जानेवारी, २०२२ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० - १ क नुसार आयोगाने जाहिर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा ३१ डिसेंबर, २०२२ किंवा त्यापूर्वीचा असेल त्याबाबतीत ज्या व्यक्तीला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत वैधता समितीकडे अर्ज सादर केल्याचा पुरावा आणि ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकांपासून बारा महिन्यांच्या आत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील असे हमीपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली होती. **सदर कालावधी संपुष्टात आल्यामुळे आता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० - १ अ (१)नुसार राखीव जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

६) परिशिष्ट अ येथील निवडणुक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल. (मात्र नक्षलग्रस्त भागामध्ये उदा. गडचिरोली, गोंदीया करीता सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)

७) निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींच्या निवडणूकी संदर्भात मा. न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपीलासंदर्भात) यांच्या स्तरावरुन देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास,

- मा.न्यायालयाचे स्थगिती आदेशास जिल्हाधिकारी यांना त्यांच्या स्तरावर स्थगितीची कार्यवाही करता येईल.
- मात्र विभागीय आयुक्त यांनी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अनर्हतेच्या प्रकरणांमध्ये निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर कोणत्याही प्रकारे स्थगिती देण्यात येऊ नये.

८) ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

९) नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१०) **केंद्र व राज्य शासनाकडून कोविड -१९ च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना व दक्षता घेण्याबाबतच्या सूचना / निर्बंध लागू झाल्यास आयोगाचे दिनांक १७/०१/२०२२ च्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.**

११) राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी क्रमांक ( ग्रा.पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

**सोबत - परिशिष्ट - १ व परिशिष्ट २**

( के. सुर्यकृष्णमूर्ती )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

४.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी

७. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

८.संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४
यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

९.पोलिस महानिरीक्षक ( सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य

१०. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१२. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित)

१३. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

१४. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग

१५. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१६. निवड नस्ती.

## परिशिष्ट १

(क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०१/का.०८,दिनांक ०६/०४/२०२३ च्या आदेशासोबतचे सहपत्र)

**निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या जागांच्या तसेच थेट सरपंचाच्या रिक्त जागांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १८/०४/२०२३ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक २५/०४/२०२३ (मंगळवार) ते दिनांक ०२/०५/२०२३ (मंगळवार) वेळ स.११.०० ते दु.३.०० (दिनांक २९/०४/२०२३ चा शनिवार, दिनांक ३०/०४/२०२३ चा रविवार व दिनांक ०१/०५/२०२३ ची सार्व. सुट्टी, वगळून) |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक ०३/०५/२०२३ (बुधवार) वेळ सकाळी ११.०० वा.पासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक ०८/०५/२०२३ (सोमवार) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०८/०५/२०२३ ( सोमवार ) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक १८/०५/२०२३ (गुरुवार) सकाळी ७.३० वा. पासून ते सायं. ५.३० वा. पर्यंत (नक्षलग्रस्त व दुर्गम भागासाठी उदा. गडचिरोली, गोंदीया जिल्ह्यासाठी सकाळी ७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत) |
| ७ | मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक १९/०५/२०२३ (शुक्रवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २४/०५/२०२३ (बुधवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

( के. सुर्यकृष्णमूर्ती )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०१/का.०८, दिनांक ०६/०४/२०२३ च्या आदेशासोबतचे सहपत्र )

## परिशिष्ट २

### रिक्त जागांच्या पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशिल

| अ.क्र. | जिल्हा | अंतिम मतदार यादी प्रसिध्द | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत संख्या | सदस्य | थेट सरपंच |
| १ | २ | ४ | ५ | ६ |
| १ | ठाणे | ११ | २५ | १ |
| २ | पालघर | १०४ | १६० | ३ |
| ३ | रायगड | ६४ | ८५ | ११ |
| ४ | रत्नागिरी | १४८ | २१० | ८ |
| ५ | सिंधुदुर्ग | ५५ | ६२ | ५ |
| ६ | नाशिक | २४२ | ३५० | ६ |
| ७ | धुळे | ४७ | ६१ | २ |
| ८ | जळगाव | ८२ | ९७ | १ |
| ९ | नंदुरबार | ८४ | १११ | ० |
| १० | अहमदनगर | १२८ | २१८ | १ |
| ११ | पुणे | १९५ | २८० | १० |
| १२ | सोलापूर | ५२ | ५५ | १ |
| १३ | सातारा | १८८ | २७९ | १२ |
| १४ | सांगली | १९ | २३ | १ |
| १५ | कोल्हापूर | ६० | ६६ | ६ |
| १६ | औरंगाबाद | ५० | ६३ | ० |
| १७ | बीड | १६ | १७ | १ |
| १८ | नांदेड | १५५ | २४७ | ७ |
| १९ | परभणी | २५ | २९ | ० |
| २० | उस्मानाबाद | २४ | ३४ | १ |
| २१ | जालना | ३९ | ४७ | ० |
| २२ | लातूर | ६६ | ७२ | ३ |
| २३ | हिंगोली | ४१ | ४८ | ३ |
| २४ | अमरावती | ७५ | ११४ | २ |
| २५ | अकोला | ५८ | ७२ | ५ |
| २६ | यवतमाळ | १३२ | २०५ | २ |
| २७ | वाशीम | ५५ | ९२ | ५ |
| २८ | बुलडाणा | ७७ | ९६ | ८ |
| २९ | नागपूर | ६९ | ७० | ८ |
| ३० | वर्धा | ४९ | ६७ | ८ |
| ३१ | चंद्रपूर | ८३ | ११२ | २ |
| ३२ | भंडारा | २१ | २६ | ० |
| ३३ | गोंदिया | २६ | २९ | ० |
| ३४ | गडचिरोली | ८० | १४४ | ३ |
| **एकूण** | | **२६२०** | **३६६६** | **१२६** |